---

मन्या आणि त्याची बायको कडाक्याचं भांडतात.

बायको : मी माहेरी जात आहे.

मन्या : मी मंदिरात जातो.

बायको : कोणताही आणि कितीही नवस बोललात,

तरी मी आता परत येणार नाही.

मन्या : नवस पुरा झाला म्हणून जात आहे.

---

मन्या : बाबा! उद्या आपण मालामाल होणार.

बाबा : ते कसं काय?

मन्या : उद्या आमचे गणिताचे शिक्षक पैसे रुपयांमध्ये बदलायला शिकवणार आहेत.

---

घटस्फोट घेऊन दोन महिने झालेले असतात.

सोडलेल्या बायकोनं त्याला फोन केला.

तो म्हणाला, “आता का फोन केला?”

ती म्हणाली, “मी कार घेतलीय आजच.”

तो म्हणाला, “आणखी चार घे, मला काय करायचंय?”

ती शांतपणे म्हणाली, “रस्ता क्रॉस करताना काळजी घे.”

---